# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बॅंक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२, फॅक्स : २२६७३११५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


क्रमांक:सीटीटी-०९२०/सीआर-४६/२०१९/तीन                                        दिनांक ७ सप्टेंबर, २०२०

**प्रसिध्दीपत्रक**

**विषय:-परीक्षांच्या सुधारित दिनांकाबाबत**

**संदर्भ:**- (१) आयोगाची दिनांक २२ मार्च, २०२०, दिनांक ७ व २० एप्रिल, २०२०, दिनांक १७ जून, २०२० व दिनांक १२ ऑगस्ट,२०२० रोजीची प्रसिध्दीपत्रके.

(२) शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक मलोआ-२०२०/प्र.क्र.८१/का-८,दि.४ सप्टेंबर, २०२०.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत एप्रिल/मे, २०२० मध्ये आयोजित करण्यात असलेल्या तीन परीक्षा नोवेल कोरोना (Covid-१९) विषाणूच्या व लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर ऐनवेळी पुढे ढकलण्यात येऊन परीक्षांचे सुधारित दिनांक संदर्भिय प्रसिध्दीपत्रकानुसार जाहिर करण्यात आले होते. आयोगामार्फत आयोजित परीक्षांच्या अनुषंगाने विविध प्रसिध्दीमाध्यमात प्रसिध्द झालेल्या बातम्यांच्या अनुषंगाने आयोगाकडून दिनांक ३१ ऑगस्ट, २०२० व दिनांक ४ सप्टेंबर, २०२० रोजीच्या पत्राद्वारे शासनाकडे संदर्भ करण्यात आला होता. त्यास अनुसरुन शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भिय दिनांक ४ सप्टेंबर, २०२० रोजीच्या पत्राद्वारे खालीलप्रमाणे आयोगास कळविण्यात आले आहे :-

**"आयोगाच्या संदर्भाधीन पत्रांच्या अनुषंगाने, आयोगाच्या परीक्षा आयोजनाबाबत शासनाने दिनांक २६ ऑगस्ट, २०२० रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत घेतलेला खालील निर्णय सदर पत्राद्वारे आयोगास अवगत करण्यात येत आहे:-**

**-कोव्हिड परिस्थितीमुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सर्व परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे."**

**२.** शासनाकडून घेण्यात आलेल्या उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने आयोगामार्फत आयोजित पुढील परीक्षा त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकास घेण्यात येतील:-

| **अ.क्र.** | **जाहिरात क्रमांक** | **परीक्षा** | **यापूर्वी निश्चित केलेला दिनांक** | **नवीन सुधारित दिनांक** |
|---|---|---|---|---|
| १ | १९/२०१९ | राज्यसेवा पूर्व परीक्षा २०२० | २० सप्टेंबर,२०२० | ११ ऑक्टोबर, २०२० |
| २ | ०५/२०२० | महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा २०२० | ११ ऑक्टोबर, २०२० | २२ नोव्हेंबर,२०२० |
| ३ | ०६/२०२० | महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा २०२० | १ नोव्हेंबर, २०२० | १ नोव्हेंबर, २०२० |

**३.** नोवेल कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्याच्या अनुषंगाने तसेच उमेदवार व परीक्षा आयोजनातील सर्व कर्मचारी यांच्या सुरक्षेसाठी आयोगाकडून शक्य त्या सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत.

**४.** नोवेल कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाच्या स्थितीच्या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी राबविण्यात येणा-या उपाययोजना व लॉकडाऊनचा कालावधी लक्षात घेऊन परीक्षेच्या आयोजनाच्या अनुषंगाने आयोगाकडून वेळोवेळी आढावा घेण्यात येईल. तसेच याबाबतची माहिती आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याकरीता आयोगाच्या संकेतस्थळाचे नियमित अवलोकन करणे, उमेदवाराच्या हिताचे राहील.

सहसचिव,परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.